प्रेस नोट दि.०७/०८/२०१८

**महिलांच्या पर्स हिसाकावणाऱ्या चोरट्यास गुन्हे शाखा, युनिट ४ चे पथकाकडुन अटक, मोबाईल व मोटार सायकलीसह एकुण २ लाख १५ हजाराचा ऐवज हस्तगत, ७ गुन्हे उघड**

दि.२६/७/२०१८ रोजी महिला नामे निलीमा योगेश सोन्नीस, वय २७ वर्षे, रा.बी -६०४, तनीष आयकोन आळंदी रोड, दत्तनगर दिघी, पुणे या त्यांचा आईसह ॲक्टीव्हा मोपेडवरून जात असताना हॉटेल विलाकासा समोर, नाशिक फाटा जवळ, बी.आर.टी रोड, नवी सांगवी येथे आल्या असता त्यांचे पाठीमागुन आलेल्या मोटार सायकल वरील इसमाने त्यांची पर्स हिसका मारून जबरदस्तीने चोरून नेली होती. त्याबाबत सांगवी पोलीस ठाणे येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल होता.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस ठाणे बरोबरच गुन्हे शाखा, युनिट ४ चे पथक करीत असताना सदर पथकातील **पोलीस हवालदार राजेंद्र शेटे** यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सांगवी येथील महिलाची पर्स आळंदीरोड, चाकण परीसरात राहणारा मुलगा सुनिल परमगोळ याने चोरली असुन तो भोसरी परीसरात येणार आहे. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश पाटील यांनी युनिट ४ कडील स्टाफसह दि.४/०८/२०१८ रोजी भोसरी भागात सापळा लावुन आरोपी सुनिल सिध्दराम परमगोळ, वय २० वर्षे, शिक्षण - आय.टी.आय, धंदा – कंपनीमध्ये कामास ह.रा. आळंदीफाटा, गवते वस्ती, गोरे यांचे खोलीमध्ये, चाकण, जि.पुणे मुळ गाव - मु.पो.कलप्पावाडी, पाण्याचे टाकी जवळ, ता.अक्कलकोट, जि.सोलापुर यांस ताब्यात घेतले. त्यांचेकडे प्रथमदर्शनी केले तपासावरून त्याने गुन्हा केल्याचे उघड झाल्याने त्यास सदर गुन्ह्यामध्ये अटक करून त्यांची मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो, पिंपरी, न्यायालय, पुणे यांचे समक्ष हजर करून **दि.०८/०८/२०१८** रोजी पर्यंत **पोलीस कस्टडी रिमांड** घेण्यात आली आहे. पोलीस कस्टडी दरम्यान त्याचेकडे तपास करता त्याचेकडून खालील गुन्हे उघडकीस आले आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | सांगवी पो.स्टे. | ३५८/१८ | कलम ३९२ | सॅमसंग व ओपो मोबा.व होरो डिलक्स मो.सा एकुण कि.रू ६०,०००/- |
| २ | एम.आय.डी.सी. | २५३/१८ | कलम ३९२ | १ सॅमसंग मोबाईल फोन कि.रू.१०,०००/- |
| ३ | भोसरी | २९२/१८ | कलम ३७९ | १ ओपो मोबाईल फोन कि.रू.१०,०००/- |
| ४ | एम.आय.डी.सी. | २५२/१८ | कलम ३७९ | १ डिस्कव्हर मो.सा.कि.रू.४०,०००/- |
| ५ | चाकण | ५७२/१८ | कलम ३७९ | १ सी.टी.१०० मो.सा.कि.रू.३५,०००/- |
| ६ | चाकण | /१८ | कलम ३७९ | १ बॉक्सर मो.सा.कि.रू.३०,०००/- |
| ७ | लोणीकाळभोर | /१८ | कलम ३७९ | १ बॉक्सर मो.सा.कि.रू.३०,०००/- |
| | | | | **एकुण कि.रू.२ लाख १५ हजार रूपयांचा माल** |

आरोपी मोटार सायकल चोरून त्यावरून पायी चालणाऱ्या व मोटार साकली वरून जाणाऱ्या माहिलांच्या पर्स व मोबाईल जबरदस्तीने चोरून नेत असे, गुन्हा करून झाले नंतर आरोपी हा गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल ही त्याचे गावी अक्कलकोट या ठिकाणी पाठवुन देत असे.

सदरची कारवाई गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त प्रदिप देशपांडे, पोलीस उप आयुक्त शिरीष सरदेशपांडे, सहा.पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ४ कडील पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी, सपोनि दिपाली मरळे, सपोनि गणेश पाटील, सपोफौ लोखंडे ,पो.हवा राजेंद्र शेटे, कैलास बोबडे, प्रमोद लांडे, पो.ना. हेमंत खरात, अमित गायकवाड, संतोष बर्गे, तानाजी गाडे, सुरेंद्र आढाव, राजेश बोरसे, सुनिल चौधरी, किरण चोरगे, प्रमोद हिरळकर, स्वप्निल शिंदे यांनी केली आहे.